महाराष्ट्र शासन

# स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
# मौजे-मेडद, ता.बारामती, पुणे.

Email ID - gacbaramati@gmail.com ContacNo. **9822961494**

---

**स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती या संस्थेतील महाविद्यालयीन साहीत्य (Shift) वाहतूक करणेसाठी वाहन सेवा घेणेकरिता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत.**

निविदा फॉर्म

१. निविदा क्र. : २०२६-२७/०२

२. शासकीय पावती क्र. व दिनांक : ..................................................

३. निविदाकाराचे पुर्ण नाव/राहते घराचा : ..................................................

व कार्यालयाचा संपुर्ण पत्ता : ..................................................

४. संपर्क दूरध्वनी क्रमांक : ..................................................

१. कार्यालय : ..................................................

२. निवास : ..................................................

३. मोबाईल : ..................................................

४. मुंबई दुकाने अधिनियम नोंदणी क्र. : ..................................................

(संपूर्ण भरलेला निविदा फॉर्म व त्यासोबत प्राप्त अटी व शर्ती इत्यादी सर्व कागदपत्रे स्वाक्षरी करुन तसेच साक्षांकित करुन लिफाफा क्र.१ मध्ये कागदपत्राच्या यादीनुसार सादर करणे आवश्यक आहे.)

दरपत्रकधारकाचे / संस्थेचे नाव

स्वाक्षरी :

दरपत्रकधारकाचा/संस्थेचा शिक्का :

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

**स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,**

**मौजे-मेडद, ता.बारामती, पुणे**

Email ID - gacbaramati@gmail.com Contac No. **9822961494**

जा.क्र.जा.क्रं.शाआमरुबा/लेखा विभाग/वखासेपु/दरपत्रक २०२६-२७/ 1392 /२०२६, दिनांक 07/07/2026

# -: दरपत्रक जाहीर सुचना :-

**विषय** :- स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती या संस्थेतील महाविद्यालयीन साहीत्य वाहतूक (Shift) करणेसाठी वाहन सेवा घेणेकरिता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय हे शिवनगर विद्याप्रसारक मंडळ, आवार माळेगांव (बु.) येथे कार्यरत आहे. नजीकच्या कालावधीत सदरील महाविद्यालय स्वत:च्या/शासनाच्या मौजे-मेडद, ता.बारामती येथील इमारतीमध्ये स्थलांतरीत होणार आहे. तरी महाविद्यालयीन विविध विभागाचे साहीत्य मौजे-मेडद येथे घेऊन जाणेकरिता (Shifting) वाहन सेवा घेणेकरिता अनुभवी वाहन कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेत येत आहेत.

तरी इच्छुक व पात्र कंत्राटदारांनी त्यांची कमीत-कमी दरांची दरपत्रके सिलबंद पाकीटामध्ये अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,बारामती यांचे कार्यालयात पोस्टाने अथवा समक्ष खालील नमुद वेळेत अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावीत.

**दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक व इतर विवरण खालीलप्रमाणे –**

| अ.क्र. | बाब | विवरण |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक फॉर्म शुल्क | — |
| 2 | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी पासुन पर्यंत | दि.07/07/2026 ते दि.14/07/2026 (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय व स्थानिक सुट्टीचे दिवस वगळून)<br>(सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत) |
| 4 | तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ (लिफाफा क्र.०१) | दिनांक - 15/07/2026 वेळ दुपारी **03.00** |
| 5 | दरपत्रक लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ (लिफाफा क्र.०२) | दिनांक - 16/07/2026 वेळ दुपारी **03.00** |
| 6 | तांत्रिक व दरपत्रक लिफाफा उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती शिवनगर विद्या प्रसारक मंडळ आवार, माळेगाव (बु), ता.बारामती, जि.पुणे-४१३ ११५. |

Scanned with OKEN Scanner

या महाविद्यालयाचे मेडद येथे नविन इमारतीचे बांधकाम पुर्ण होत आले असून, महाविद्यालयीन साहीत्य वाहतूक (Shift) करणेसाठी वाहन सेवा घेणेकरिता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत.

वाहनासोबत महाविद्यालयीन साहीत्य वाहतूक (Shifting) करण्याकरिता अवजड काम करता येणारे निरोगी व सुदृढ पुरुष हमालाची आवश्यकता आहे.

निविदा दोन प्रपत्रामध्ये (प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब) भरुन लिफाफा क्र.०१ (प्रपत्र-अ कागदपत्रे) व लिफाफा क्र.०२ (प्रपत्र-ब दरपत्रक) सिलबंद करुन लिफाफावर लिफाफा क्र.०१ (प्रपत्र-अ कागदपत्रे) व लिफाफा क्र.०२ (प्रपत्र-ब दरपत्रक) असे स्पष्ट नमूद करुन सीलबंद लिफाफात वेगवेगळे (Seprate) टाकावेत व लिफाफावर **"स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, बारामती या महाविद्यालयीन साहीत्य वाहतूक** (Shift) **करणेसाठी वाहन सेवा घेणेकरिता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत"** असे नमूद करुन सीलबंद लिफाफा संस्थेच्या कार्यालयात विहित कालावधीत सादर करावा. विहित कालावधीत प्राप्त न होणा-या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही, तसेच टपालाव्दारे विहित कालावधीनंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र-अ व कागदपत्रे) उघडण्यात येऊन दरपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे ? याबाबत खात्री करण्यात येईल, आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी दरपत्रके अपात्र ठरविण्यात येतील. जे दरपत्रकधारक उपरोक्त प्रक्रियेदरम्यान उपस्थित राहू इच्छितात त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे. लिफाफा क्र.०२ (प्रपत्र-ब व दरपत्रक) उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा क्र.०१ च्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या दरपत्रकधारकांची, दरपत्रिकेची नियुक्त समिती मार्फत अर्हता छानणी करण्यात येईल, दोन किंवा अधिक दरपत्रकधारकांचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे वाटाघाटींसाठी/चर्चेसाठी बोलावले जाईल व त्याआधारे अंतिम निर्णय घेतला जाईल.

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे दरपत्रके सादर केली आहेत त्याच नावे असणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफे उघडल्यावर खरेदी समितीने मागणी केल्यास सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. दरपत्रक धारकास निविदा भरताना काही अडचण असल्यास किंवा काही बाबतीत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास या कार्यालयाशी संपर्क साधावा.

कोणत्याही क्षणी दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती यांना राहतील.

अधिष्ठाता,
स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
बारामती.

Scanned with OKEN Scanner

# स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, मौज-मेडद, ता.बारामती या संस्थेत महाविद्यालयीन साहीत्य वाहतूक करणेसाठी वाहन सेवा सेवेसंबधीच्या करारनाम्यातील नियम, अटी व शर्ती -

१ महाविद्यालयीन विविध विभागाचे साहीत्य शिवनगर विद्याप्रसारक मंडळ आवार माळेगांव (बु.) येथुन शासनाच्या नवीन इमारतीमध्ये (बारामती-मोरगांव रोड) मौजे-मेडद, ता.बारामती येथे घेऊन जाणे. (**अंदाजे अंतर ७ कि.मी.**)

२ कार्यारंभ आदेश (वर्क आर्डर) मिळाल्यानंतर दिलेल्या कालावधीत महाविद्यालयीन सर्व साहीत्यची वाहतूक (Shifting) करणे बंधनकारक राहील.

३ दरपत्रक धारकांनी दोन्ही वाहनांचे दरपत्रक सादर करणे अनिवार्य राहिल.दोन्ही वाहनांचे स्वतंत्र दरपत्रक दिल्यास ग्राहय धरले जाणार नाही. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नसावा तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

४ दरपत्रकासोबत पॅनकार्ड, आधार कार्ड यांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक राहील.

५ दरपत्रकानुसार मंजूर दराव्यतिरीक्त इतर कोणतेही दर देय होणार नाही.

६ आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बॅक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बॅक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

७ अधिष्ठाता, स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती हे सदर दरपत्रक स्विकारणे, रद्द करणे, यशस्वी दरपत्रक स्विकारण्याच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखील कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार तसेच वाहतूक दरप्रक्रियेच्या अटी व शर्ती मध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

८ सादर केलेले दर हे आर्थिक वर्ष सन २०२६-२७ साठी अनुज्ञेय राहतील.

९ वाहतूक भाडयाचे देयक तीन प्रतीत महाविद्यालयास सादर करावे. महाविद्यालयास शासनाकडुन प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच देयकाची रक्कम अदा करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

१० साहीत्य वाहतूक करताना त्याची योग्य ती काळजी घेण्यात यावी. साहीत्याची तुट - फुट झाल्यास त्याची भरपाई आपले भाडेमधुन वसूल करण्यात येईल.

११ महाविद्यालयातील वाहतूक करण्यात येणारे साहीत्य महाविद्यालय/विभागाकडुन शक्य होईल तेवढे पॅकींग करुन देण्यात येईल.

१२ माळेगांव (बु.) येथील महविद्यालयातील साहीत्य हे तळमजला (Ground Floor) ते पहिला मजला येथून ते मौजे-मेडद येथील ज्या-त्या विभागामध्ये बेसमेंट, तळमजला (Ground Floor) व पहिला मजला येथे सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

१३ महाविद्यालयाचे किंमती व मौल्यवान साहीत्य असुन, पावसाचे दिवस असल्याने साहीत्य भिजून खराब होऊ नये याकरिता सादर वाहनाची बॉडी बांधलेली असावी. तसेच साहित्य पाण्याने भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.

वरील अ.क्र.१ ते १३ अंतर्गत नमूद सर्व नियम, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला मान्य व बंधनकारक राहतील.

Scanned with OKEN Scanner

# दरपत्रकधारकाचे हमीपत्र

स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती या संस्थेतील महाविद्यालयीन साहीत्य वाहतूक करणेसाठी वाहन सेवा घेणेकरिता दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत.

मी/आम्ही या कामाबाबतचे दरपत्रकामधील नमुद सर्व अटी व शर्ती प्रमाणे "अ" पाकिटामध्ये सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मी/आम्ही केलेली आहे. सदरची कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत. तसेच या प्रतिज्ञापत्राद्वारे मी/आम्ही/आमचे कुटुंबीय/नातेवाईक या संस्थेचे अथवा शासकीय/निमशासकीय संस्थेचे सभासद/अधिकारी/कर्मचारी नाहीत, अशी या हमीपत्राद्वारे ग्वाही/हमी देत आहे.

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी
दरपत्रकधारक/संस्थेचा शिक्का

दरपत्रकधारकाचे नाव :-...........................
..................................................

दरपत्रकधारकाचा संपूर्ण पत्ता ......................
..................................................

Scanned with OKEN Scanner

# दरपत्रकधारकाचे प्रतिज्ञापत्र

स्व.अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती या संस्थेतील महाविद्यालयीन साहीत्य (Shift) वाहतूक करणेसाठी वाहन सेवा घेणेकरिता दोन लिफाफा पध्द्तीने दरपत्रक मागविणेबाबत.

याबाबतचे दरपत्रक मी/आम्ही काळजीपुर्वक वाचले असून, दरपत्रकामधील सर्व अटी व शर्तीप्रमाणे "अ" पाकीटामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची पुर्तता मी/आम्ही केलेली आहे. मी/आम्ही सादर केलेली कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत. या दरपत्रकामधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत. मी/आम्ही सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यतेबाबत काही प्रश्न उद्‌भविल्यास किंवा सदरची कागदपत्रे खोटी आहेत असे आढळल्यास दरपत्रकाच्या कोणत्याही टप्प्यावर माझ्यावर कायदेशीर करवाईस पात्र राहील.

तसेच सदर दरपत्रक प्रकरणी माझ्या/संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या सर्व मनुष्यबळ/हमाल कामगार कायदाअंतर्गत येणाऱ्या सर्वबाबी कामगार विभागाअंतर्गत कायद्याचे पुर्तता करण्याची जबाबदारी माझी/संस्थेची राहील. या संदर्भात एखादा कायदेशीर प्रश्न उद्‌भविल्यास याची सर्व जबाबदारी माझी/संस्थेची राहील व ते माझ्यावर बंधनकारक राहील. कामगार कायद्‌यातील तरतूदींचे पालन करण्याची जबाबदारी सुध्दा माझी/माझ्या संस्थेची राहील.

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी
दपत्रकधारक/संस्थेचा शिक्का

दरपत्रकाधारकाचे नाव :-..........................
...............................................

दरपत्रकाधारकाचा संपूर्ण पत्ता ......................
...............................................

Scanned with OKEN Scanner

## लिफाफा क्र.०१ प्रपत्र – अ

## "अ" पाकिटात सादर करावयाचे आवश्यक कागदपत्रे व नियम व अटी शर्ती

१ वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

२ वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र (R.C.Book) सादर करणे आवश्यक आहे.

३ वाहनाची शासन नियमानुसार आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

४ ठेकेदाराचे प्रतीज्ञापत्र आणि हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

५ निविदेमधील नमूद अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र स्वाक्षरी व शिक्यासह जोडणे आवश्यक आहे.

६ उक्त नमूद अटींमध्ये शिथिलता देण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राहतील.

वरील अ.क्र.०१ ते ०६ मधील सर्व आवश्यक कागदपत्रे यादी क्रमांकानुसार लिफाफा क्र.१ सादर करण्यात आलेली आहेत.

दरपत्रकधारकाचे/संस्थेचे नाव :-

स्वाक्षरी :-

दरपत्रकधारकाचा/संस्थेचा शिक्का :

Scanned with OKEN Scanner

## लिफाफा क्र.०२ प्रपत्र - ब

| अ.क्र. | वाहन प्रकार | ०१ फेरीचा दर (GST सह) |
|---|---|---|
| १ | २० ते २२ फुटी वाहन, १० ते १२ टन क्षमता | |
| २ | १० फुटी वाहन, १ ते १.५ टन क्षमता | ०१ फेरीचा दर (GST सह) |

| अ.क्र. | मनुष्यबळ / हमाल संख्या | एक दिवसाचा मजूरी दर |
|---|---|---|
| १ | ०४ हमाल (पुरुष) | |

Scanned with OKEN Scanner